ठाणे, बुधवार दि. २८ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १२१ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे

# ठाण्यात गोविंदा पथकाची १० थराच्या विक्रमासाठी स्पर्धा

## ■ ठाण्यात सेलिब्रिटींची मांदियाळी

ठाणे – ठाण्याची संस्कृती, संस्कृतीचे ठाणे हे दहीहंडीच्या जल्लोषातून मंगळवारी पाहायला मिळाले. दहीहंडीच्या दिवशी मुंबई आणि आसपासच्या शहरातील गोविंदा पथकाची मोठी मुसंडी ही ठाण्यात पाहायला मिळाली. तर दहीहंडीची पंढरी समजल्या जाणाऱ्या ठाणे नगरीत मंगळवारी श्रावणसरींच्या वर्षावात मोठ्या उत्साहात दहीहंडीचा सण साजरा करण्यात आला. ठाणे तसेच मुंबई आणि उपनगरातून विविधारंगी टी शर्टस परिधान करून गोविंदा पथके सकाळपासूनच ठाण्यात दाखल झाल्याने दहीहंडीचे 'ठाणे' गजबजुन गेले होते.

## ■ संध्याकाळपर्यंत पाच गोविंदा जखमी

मंगळवारी ठाण्यात गोविंदांची पंढरीचे रूप पाहायला मिळाले. त्यातच यंदा ठाण्यात लाखोंच्या दहिहंड्यामुळे यंदा गोविंदा पथकांची चांगलीच कमाई झाली. सकाळपासूनच ठाण्यात दाखल झाल्याने दहीहंडीचे 'ठाणे' गजबजुन गेले होते. रस्तोरस्ती गोविंदा पथकांचे जथ्तेच्या जथ्थे उत्सवी उन्मादात फिरत असल्याने ठाणे गोविंदामय झाले होते. गोविंदा पथकांनी ठाण्यात ठिकठिकाणी थरांची सलामी देऊन रोख रक्कमेसह चषक अशी बहुमोल पारितोषिके पटकावली. (पान २ वर)

## राजकीय पक्षांच्या लाखोंच्या हंड्या

ठाण्यातील वर्तकनगर येथे संस्कृती युवा प्रतिष्ठान व आ. प्रताप सरनाईक फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित संस्कृतीची विश्वविक्रमी दहीहंडीत जयजवान गोविंदा पथकाने प्रथमच साडेनऊ थर लावुन विश्वविक्रम मोडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे २५ लाखांचे पारितोषिक कोणीही पटकवू शकले नाही.



■ ठाण्यातील माजी आमदार रविंद्र फाटक यांच्या संकल्प प्रतिष्ठानच्या रघुनाथ नगर येथील दही हंडीत जयजवान पथकाने एकावर एक चार एक्के उभारीत नऊ थरांची सलामी दिली.-- (छाया : मनोज सिंह.)

# गो गो गो गोविंदा...

## ठाण्यात दहीहंडीचा उत्साह शिगेला

मुंबई – 'गो गो गो गोविंदा गोविंदा रे गोपाळा, यशोदेच्या तान्ह्या बाळा' असा जयघोष सध्या मुंबईसह संपूर्ण ठाणे, नवी मुंबई आणि पुण्यात पाहायला मिळत आहे. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात दहीहंडीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई, ठाण्यात लाखो रुपयांचे पारितोषिक असलेल्या उंचच उंच दहीहंडी बांधण्यात आल्या आहेत. तर त्यांना फोडण्यासाठी दहीहंडी पथकांमध्ये चुरस रंगणार आहे. मुंबईत दादरमधील आयडिअल, जांभोरी मैदान, घाटकोपर, आयसी कॉलनी या ठिकाणी मोठ्या दहीहंडी पाहायला मिळत आहे. तसेच यंदाही संस्कृती युवा प्रतिष्ठान, मनसेची दहीहंडी, टेंबी नाका, स्वामी प्रतिष्ठान, संकल्प प्रतिष्ठान यांच्याही हंड्या उभारण्यात आल्या आहेत. यावेळी लाखो रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

### लाखो रुपयांचे पारितोषिक जाहीर

मुंबई आणि ठाण्यात जवळपास १ हजार ३५४ दहीहंडी उत्सवांचं आयोजन करण्यात आलं आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई, ठाण्यात लाखो रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आली आहेत. यावेळी गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्ड मोडणाऱ्या गोविंदा पथकाला २५ लाखांचे बक्षीस दिले जाणार आहे. तर ठाण्यात टेंभी नाक्याला मुख्यमंत्री शिंदेंची दहीहंडी असून बक्षिसाची रक्कम पुरुषांसाठी १ लाख ५१ हजार, महिलांसाठी १ लाख आहे. त्याशिवाय प्रकाश सुर्वे यांच्या दहीहंडीत १ लाख रुपयाच्या बक्षीसाची घोषणा करण्यात आली आहे.

# महायुतीच विधानसभेची हंडी फोडणार – मुख्यमंत्री शिंदे

ठाणे : विरोधकांनी किती टीका केली तरी तुमच्या बळावर काम करतच राहणार असल्याचे सांगत आगामी विधानसभेची दहीहंडी महायुतीच फोडणार आहे, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टेंभीनाक्यावरील दहीहंडी उत्सवात बोलताना केला. ठाण्यात टेंभी नाका मित्र मंडळाच्या वतीने मंगळवारी दिघे साहेबांची दहीहंडी मानाची हंडीचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाला मुख्यमंत्री शिंदे यांनी उपस्थिती लावत गोविंदांशी आणि नागरिकांशी संवाद साधला. विरोधकांनी कतीही आरोप केले, (पान २ वर)

# कोणत्याही गुन्हेगाराला सोडणार नाही–मुख्यमंत्री

## ■ शासन गोविंदा पथकांच्या पाठीशी उभे

## ■ लाडकी बहीण प्रमाणेच सुरक्षित बहीण ही जबाबदारीही शासनाचीच

ठाणे –हे शासन गोविंदा पथकांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे आहे आणि यापुढेही राहील. शासनाकडून गोविंदांसाठी जे जे शक्य आहे ते सर्व काही करण्यात येईल. लाडक्या बहिणी प्रमाणेच सुरक्षित बहीण ही जबाबदारी देखील शासनाचीच आहे, शासनाने ही जबाबदारी निश्चितपणे स्वीकारली आहे. हे शासन कोणत्याही गुन्हेगाराला सोडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली. प्रताप सरनाईक फाउंडेशन आणि संस्कृती युवा प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी उत्सवात ते बोलत होते. यावेळी खासदार नरेश मस्के, आमदार प्रताप सरनाईक, पूर्वेश सरनाईक, संस्कृती युवा प्रतिष्ठानचे इतर सर्व पदाधिकारी, विविध गोविंदा पथके व गोविंदाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, हा खेळ पाहून आम्हालाही आमचे बालपण आठवते. (पान २ वर)

## अडीच वर्षापुर्वी पापाची हंडी फोडली – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

....सविस्तर वृत्त पान २)





■ कॅसल मील चौकात भाजप नेते मा.नगरसेवक कृष्णा दादू पाटील व मा.नगरसेविका नंदा कृष्णा पाटील यांच्या शारदा संकल्प प्रतिष्ठान गोकुळ दहीहंडी उत्सव २०२४ व भाजपा ठाणे शहर जिल्हा आयोजित दहीहंडी उत्सवात खोपटचा राजा गोविंदा पथकाने ९ थर लावले. या ठिकाणी एकूण ५५ लाखांची बक्षिसे दिली जाणार आहेत. (छाया : मनोज सिंह)












ठाण्यात टेंभी नाका येथील धर्मवीर आनंद दिघे आयोजित दहीहंडी उत्सवात अभिनेता जॉकी श्रॉफ, प्रसाद ओके आदी सह विविध गोविंदा पथकांनी गर्दी केली.....





ठार्णे, कोपरी परिसरात अष्ठविनायक चौकत मुख्यमंत्री दहीहंडी उसव २०२४ दहिकाला ऊसावत ठाण्याचा राजा गोविंदा पथकाने कडक ८ थराची सलामी देत उपस्थित प्रकाशकांची मने जिंकली आहे.छाया – मनोज सिंह

■ ठाणे येथे आ. प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या वर्तकनगर येथील दहीहंडीत थरांच्या थरारा सोबतच विविध जनजागृतीपर उपक्रम साजरे करण्यात आले. यात कॅन्सरमुक्त झालेल्या नागरिकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कॅन्सरची दही हंडी फोडुन सामाजिक संदेश दिला. यावेळी विविध गोविंदा पथकांनी महिला अत्याचारा विरोधात फलकबाजी केली. तर ओमसाई गोविंदा पथकाने पथनाटय सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधुन घेतले.















ठाण्यातील रघुनाथ नगर येथे संकल्प प्रतिष्ठानातर्फे 'दहीहंडी महोत्सव २०२४' श्री कृष्ण जन्माष्टमीनिमित्त 'सेलिब्रिटी दहीहंडी' चे आयोजन करण्यात आले होते यावेळी अभिनेते श्री. अंशुमन विचारे व हास्य जत्रेच्या संपूर्ण टीमने मोठ्या उत्साहात दहीहंडी फोडून कार्यक्रमाची सुरुवात जल्लोषात केली





राज्यात महिलांवरील अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना भर चौकात फाशीची शिक्षा देण्यासाठी शासनाने कडक कायदा तयार करून शासन निर्णय घ्यावा अशी मागणी ओम साई नवभारत गोविंदा पथक नालासोपारा यांनी जांभळी नाका येथे राजन विचारे यांनी आयोजित केलेल्या आनंद चॅरिटेबल ट्रस्टच्या महा दहीहंडी उत्सवात याचे प्रात्यक्षिक करून उपस्थितच्या भुवया उंचावल्या आहेत

# गुड न्यूज, सिडकोकडून नवी मुंबईतील ९०२ घरांसाठी लॉटरी

नवी मुंबई : शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित म्हणजेच सिडको यांच्याकडून नवी मुंबईतील ९०२ घरांसाठी लॉटरी काढण्यात आली आहे. नवी मुंबईत घर घेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी असणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतील सिडकोच्या कळंबोली, खारघर आणि घणसोली येथील घरांसह व्हॅलीशिल्प, स्वप्नपूर्ती आणि वास्तूविहार सेलीब्रेशन येथील एकूण सिडकोकडून ९०२ घरांसाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर या योजनेच्या सोडतीसाठी दुपारी बारा वाजल्यापासून अर्ज दाखल करता येतील. सिडकोच्या वेबसाईटवर या ९०२ घरांसाठी नोंदणी करता येणार आहे. या घरांसाठी अर्ज सादर करण्यासाठी सिडकोच्या वेबसाईटवर २७ ऑगस्ट म्हणजेच आज दुपारपासून सुरुवात होणार आहे.

## योजनेचं वेळापत्रक

- ऑनलाईन अर्ज नोंदणी : २७ ऑगस्ट २०२४ दुपारी १२ वाजता नोंदणी सुरु ते २५ सप्टेंबरपर्यंत
- सोडतीसाठी ऑनलाईन अर्जाची सुरुवात : २७ ऑगस्ट २०२४ दुपारी १२ वाजता नोंदणी सुरु ते २६ सप्टेंबरपर्यंत
- ऑनलाईन शुल्क भरणा : २७ ऑगस्ट ते २७ सप्टेंबर
- संगणकीय सोडत : १० ऑक्टोबर

## सिडकोच्या घरांची किंमत किती?




सिडकोच्या घरांची किंमत कमीत कमी २६ लाखांपासून २ कोटी रुपयांपर्यंत आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिक, मध्यम उत्पन्न गट आणि उच्च उत्पन्न गटातील नागरिकांसाठी ही घरं उपलब्ध आहेत. सिडकोनं अधिकृत वेबसाईटवर अर्ज नोंदणी करण्याचं आवाहन केलं आहे. दरम्यान, म्हाडानं मुंबईत २०३० घरांची लॉटरी काढलेली असताना लगेचच सिडकोची लॉटरी देखील जाहीर झाल्यानं मुंबई आणि नवी मुंबईत घर घेणाऱ्यांसाठी सुवर्णसंधी आहे. सिडकोच्या या योजनेची सोडत १० ऑक्टोबरला होणार आहे. ज्या नागरिकांना घर घ्यायचं आहे ते सोडतीसाठी नोंदणी करु शकतात.

## सिडकोच्या घरांची वैशिष्ट्ये

- ९०२ एवढ्या प्रमाणावर सदनिका उपलब्ध
- रस्ते, रेल्वे, मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी
- आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण गृहसंकुले
- शाळा, महाविद्यालय, रुग्णालय इ. मूलभूत सुविधांनी परिपूर्ण परिसर
- विकसित नोडमध्ये व मोक्याच्या ठिकाणी असणारी गृहसंकुले
- घणसोली, खारघर व कळंबोली नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या सदनिकांकरिता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रु. २.५० लाखांचे अनुदान उपलब्ध
- सिडकोची ही घरं आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, खुला प्रवर्ग, मध्यम उत्पन्न गटांसाठी असतील. कळंबोली, खारघर आणि घणसोली येथे एकूण २१३ घरं आहेत. यापैकी १७५ सर्वसामान्य प्रवर्गासाठी तर ३८ घरं आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आहेत. खारघरमध्ये सिडकोचे सप्नपूर्ती आणि वास्तूविहार सेलीब्रेशन हे प्रकल्प देखील आहेत. तिथं ६८९ घरं उपलब्ध आहेत.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## भारत - अमेरिका संरक्षण सहकार्य करार महत्वाचा

देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह २३ ऑगस्टपासून चार दिवसीय अमेरिका दौर्‍यावर गेले होते. या दौर्‍यादरम्यान अमेरिका व भारत या उभय देशांमध्ये महत्त्वाच्या करारावर स्वाक्षर्‍या करण्यात आल्या. हे दोन्ही करार पुरवठा केल्या जाणार्‍या वस्तूंना प्राधान्य आणि संपर्क अधिकार्‍यांच्या कामकाजासंदर्भात आहेत. आजपर्यंत दोन्ही देशांमध्ये महत्त्वपूर्ण द्विपक्षीय लष्करी करार होत आले आहेत; ज्यांनी गेल्या दशकात दोन्ही देशांमधील संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य बळकट केले आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी त्यांच्या अधिकृत भेटीदरम्यान, भागीदार राष्ट्रांनी २०२३ यूएस-इंडिया रोडमॅप अंतर्गत जेट इंजिन, मानवरहित फलाट, युद्धसामग्री व ग्राउंड मोबिलिटी सिस्टीमसह प्राधान्य सह-उत्पादन प्रकल्पांना पुढे नेण्यास सहमती दर्शविली. भविताव्यात दोन्ही देशांतील संबंध दृढ व्हावेत, असे प्रयत्न भारताकडून सुरू आहेत, असे दिसते. सिक्युरिटी ऑफ सप्लाय अरेंजमेंट (एसओएसए) अंतर्गत अमेरिका आणि भारत हे दोन्ही देश राष्ट्रीय संरक्षणाला प्रोत्साहन देणार्‍या वस्तू आणि सेवांसाठी एकमेकांना परस्पर प्राधान्य देणार आहेत. या करारामुळे दोन्ही देशांना राष्ट्रीय सुरक्षेच्या गरजेनुसार आवश्यक असलेली औद्योगिक संसाधने कोणत्याही अडथळ्याशिवाय मिळविणे शक्य होईल, असे यूएस डिपार्टमेंट ऑफ डिफेन्स (डीओडी)ने एका निवेदनात म्हटले आहे. अमेरिकेने यापूर्वी १७ देशांबरोबर हा करार केला आहे. डीओडीच्या मते एसओएसए अमेरिकेच्या संरक्षण व्यापार भागीदारांबरोबरचे संबंध मजबूत करणारा करार असला तरी कायदेशीररीत्या बंधनकारक नाही. डीओडी भारताबरोबर दुसर्‍या करारावर स्वाक्षरी करण्याचीही तयारी करीत आहे; या कराराचे नाव रेसिप्रोकल डिफेन्स प्रोक्योरमेंट (आरडीपी) हे आहे. हा करार कायदेशीररीत्या बंधनकारक असेल. अमेरिकेने आतापर्यंत २८ देशांबरोबर आरडीपी करार केला आहे. भरतासोबतच्या या करारामुळे दोन्ही देशातील आर्थिक, संरक्षणविषयक संबंध सुधारतील अशी अपेक्षा आहे. हा संपर्क अधिकार्‍यांच्या नेमणुकीसंबंधीचा करार आहे. हा करार भारत आणि अमेरिका यांच्यातील माहितीची देवाणघेवाण वाढविण्यासाठी आणि भारतीय सशस्त्र दलातील अधिकार्‍यांना महत्त्वाच्या धोरणात्मक यूएस कमांडमध्ये नियुक्त करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. फ्लोरिडा येथील यूएस स्पेशल ऑपरेशन कमांडच्या मुख्यालयात भारत आपला पहिला संपर्क अधिकारी तैनात करणार आहे. सप्टेंबर २०१३ मध्ये भारत-अमेरिका यांच्यातील संरक्षण सहकार्याची घोषणा आणि अमेरिका-भारत संरक्षण संबंधासाठी २०१५ मध्ये तयार करण्यात आलेले फ्रेमवर्क यामध्ये दोन्ही देशांनी संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढविण्यासाठी स्वतःला वचनबद्ध केले आहे. संरक्षण औद्योगिक सहकार्यासाठी गत वर्षी जारी केलेल्या रोडमॅपमध्ये एसओएसए आणि आरडीपी या दोन्ही करारांचा उल्लेख करण्यात आला होता. अमेरिकेने भारतीय संरक्षण उद्योगाच्या जागतिक पुरवठा साखळीत योगदान देण्याचे आणि जहाज व विमानदुरुस्ती, तसेच देखभालीसाठी इंडो-पॅसिफिक क्षेत्रीय केंद्र तयार करण्यासाठी नौदल आणि सागरी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी भारताला पाठिंबा दिला. रोडमॅपमध्ये एअर कॉम्बॅट व सपोर्ट, एरो इंजिन, युद्धसामग्री प्रणाली, गतिशीलता आदी गोष्टी प्राधान्य स्थानी होत्या. जानेवारी २०२३ मध्ये स्ट्रॅटेजिक टेक्नॉलॉजी आणि संरक्षण औद्योगिक सहकार्याचा विस्तार करण्यासाठी क्रिटिकल अ‍ॅण्ड इमर्जिंग टेक्नॉलॉजी (आयसीईटी)वर दोन्ही देशांनी चर्चा केली. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि जेक सुलिव्हन यांनी सह-विकास आणि सह-उत्पादनासह क्रिटिकल अ‍ॅण्ड इमर्जिंग टेक्नॉलॉजीमध्ये अधिक सहकार्याच्या संधी आणि विस्ताराच्या मार्गांवर चर्चा केली.जून २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौर्‍यादरम्यान डीओडी आणि संरक्षण मंत्रालयाने भारत-अमेरिका डिफेन्स एक्स्लरेशन इको सिस्टीम (इंडस-एक्स) लाँच केली. या करारानुसार भारत आणि अमेरिका आता जागतिक समस्या सोडविण्यासाठी एकत्र काम करू शकतात. २००२ मध्ये भारत आणि अमेरिकेने लष्करी माहितीची देवाणघेवाण सुलभ करण्यासाठी जनरल सिक्युरिटी ऑफ मिलिटरी इन्फॉर्मेशन अ‍ॅग्रीमेंटवर स्वाक्षरी केली होती. २०१६ व २०२० दरम्यान दोन्ही बाजूंनी आणखी चार करारांवर स्वाक्षर्‍या करण्यात आल्या. २०१६ चे लॉजिस्टिक एक्स्चेंज मेमोरँडम ऑफ अ‍ॅग्रीमेंट दोन्ही देशांच्या सैन्यांमधील लॉजिस्टिक सपोर्ट, पुरवठा व सेवा यांच्या सुलभतेसाठी आहे. २०१८ मध्ये कम्युनिकेशन्स कर्म्पॅटिबिलिटी अ‍ॅण्ड सिक्युरिटी ग्रीमेंट आणि कम्युनिकेशन्स अ‍ॅण्ड इन्फॉर्मेशन सिक्युरिटी मेमोरँडम ऑफ ग्रीमेंटवर दोन्ही देशांनी स्वाक्षर्‍या केल्या. देशांमधील लष्करी दळणवळण सुरक्षित करण्यासाठी प्रगत संरक्षण प्रणालींमध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी हे करार करण्यात आले. २०२० च्या बेसिक एक्स्चेंज अ‍ॅण्ड को-ऑपरेशन ग्रीमेंट कराराचा उद्देश नकाशे, समुद्री चार्ट आणि इतर अवर्गीकृत प्रतिमा व डेटा यांसह लष्करी माहितीची देवाणघेवाण सुलभ करणे असा आहे. २०१६ मध्ये अमेरिकेने भारताचा उल्लेख प्रमुख संरक्षण भागीदार म्हणून केला. २०१८ मध्ये भारताला स्ट्रॅटेजिक ट्रेड ऑथोरायजेशन टियर-१ चा दर्जा देण्यात आला, ज्याने भारताला अमेरिकेच्या वाणिज्य विभागाद्वारे नियंत्रित केलेल्या लष्करी आणि तंत्रज्ञानाच्या श्रेणीमध्ये परवानामुक्त प्रवेश मिळाला. यापूर्वी २०१२ मध्ये दोन्ही देशांमधील औद्योगिक सहकार्य आणि संरक्षण व्यापाराला चालना देण्यासाठी डिफेन्स ट्रेड अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी इनिशिएटिव्ह करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती. अमेरिकेकडून भारतीय लष्करी खरेदीमध्ये मल्टीरोल हेलिकॉप्टर, सिग सॉवर रायफल्स आणि एम ७७७ अल्ट्रा लाईट्स हावित्झर्स यांचा समावेश आहे. भारतात एलसीए एमके २ लढाऊ विमानांसाठी जेट इंजिन तयार करण्यासाठी आणि हाय-अल्टीट्युड लाँग-एंड्युरन्स खरेदी करण्यासाठी वाटाघाटी सुरू आहेत. भारत आणि अमेरिका यांच्यामधील द्विपक्षीय करारामुळे भारत संरक्षण सिद्धतेकडे पोहोचत असल्यास नवल नाही.

# पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करा

### पालिका आयुक्त अजय वैद्य यांचे प्रतिपादन

## सार्वजनिक गणेशोत्सवापूर्वी विसर्जन घाट, रस्ते दुरूस्ती, साफ सफाईची कामे पुर्ण करणार

## पाच कृत्रिम तलाव तयार करणार

**भिवंडी- सार्वजनिक गणेशोत्सव सण भिवंडी शहरात मोठ्या प्रमाणात साजरा होतो. या सणाच्या तयारीकरिता पालिका प्रशासन पुर्ण सज्ज होत आहे. गणेशोत्सापूर्वी सर्व प्रमुख रस्त्यांची दुरूस्ती, विसर्जन घाट दुरूस्ती, गणेशोत्सव मंडळ परिसरात साफ सफाई ओषध फवारणी करणार. शासनाच्या निर्देशाप्रमाणे कमी दरात मंडप शुल्क आकारून मंडप परवानगी देण्यात येणार. शासनाच्या निर्देशाप्रमाणे पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले.**



सार्वजनिक गणेशोत्सव याबाबत पुर्व तयारी आढावा बैठक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदादिकारी, भिवंडी पोलीस प्रशासन, वाहतूक पोलीस, टोरंट पावर, यांची संयुक्त बैठक पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली पालिकेत आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पालिका आयुक्त अजय वैद्य बोलत होते. या बैठकीला महामंडळाचे अध्यक्ष मदन भोई, व त्यांचे अन्य पदाधिकारी, सहायक पोलीस उपायुक्त दीपक देशमुख, अन्य वरीष्ठ पोलीस अधिकारी, टोरंट पावर कंपनीचे अधिकारी, पालिका अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, शहर अभियंता सचिन नाईक, पाणी पुरवठा उपअभियंता संदीप पटनावर, पालिकेचे विविध विभागाचे अधिकारी वर्ग उपस्थित होते.

पालिका आयुक्त म्हणाले की, लोकसभा निवडणूक आचार संहिता व गेल्या महिन्यात मोठ्या प्रमाणात झालेली पर्जन्यवृष्टी, तसेच गेल्या दोन तीन दिवसात परत पावसाचा जोर परत वाढला आहे त्यामुळे रस्ते दुरूस्ती व विसर्जन घाटांची दुरूस्ती काम करण्यात अडथळे येत आहेत. पण सर्व मिरवणूक मार्गावरील रस्ते दुरूस्ती व विसर्जन घाट दुरूस्तीकरीता पालिका प्रशासन सर्वातोपरी प्रयत्न करीत आहे. सणाच्या दिवसात सर्वत्र साफसफाई स्वच्छता ठेवणेत येईल, चौवीस तास घंटागाड्या कार्यरत राहतील, वराळ देवी तलावातील प्रदुषण कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे. पाणी पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घेण्यात येत आहे. रस्त्यावरील पथदिवे सुरू राहतील, वैद्यकीय यंत्रणा विसर्जन घाटावर कार्यरत राहील. विसर्जनाच्या सर्व ठिकाणी अत्यावश्यक सर्व यंत्रणा कार्यरत राहील. गणेश भक्तांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याकरीता पालिका प्रशासन सज्ज आहे. महामंडळाचे अध्यक्ष मदन भोई यांनी रस्त्याच्या खड्यां बाबत, विसर्जन घाट दुरूस्ती, साफसफाई, विसर्जन घाटांवरील सुविधा याबाबतच्या समस्या पालिका प्रशासनासमोर मांडल्या. सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करताना पालिका प्रशासन तयारी करत आहे. त्याची माहिती दिली. मिरवणूक मार्गावरील प्रमुख रस्त्यांची दुरूस्ती. विसर्जन घाटांची दुरूस्ती व अन्य सर्व अत्यावश्यक सेवा पुरविण्यात येतील. याची माहिती बैठकीत दिली. नागरिकांनी, गणेश भक्तांनी देखील सहकार्य करावे, देखाव्यात थर्माकॉलचा वापर करू नये, केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ २०२० च्या मार्गदर्शक सुचना त्यानुसार व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचना या नुसार उत्सव साजरे करावेत. जलप्रदुषण होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यावी, घरगुती गणेश मुर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करणे, त्याकरीता शहरात पाच ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करण्यात येतील त्याचा वापर नागरिकांनी करावा. सर्व विसर्जन घाटांवर निर्माल्य कलश, पुजेतील निर्माल्य यांपासून सेंद्रीय खताची निर्मिती करणे, अन्य कच-याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने लावणे करीता उद्यान विभाग कार्यरत आहे. सर्व काम करताना नागरिकांची साथ अपेक्षित आहे. सर्व नागरिकांनी पर्यावरण पुरक गणेशोत्सव साजरा करणेकामी पालिका प्रशासनाला मदत करावी असे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी या प्रसंगी महामंडळाचे पदाधिकारी यांच्या मार्फत नागरिकांना केले आहे.

## ठाण्यात गोविंदा पथकाची १० थराच्या विक्रमासाठी स्पर्धा

**(पान १ वरून) ■ राजकीय पक्षांच्या लाखोंच्या ठाण्यात हंड्या....** - ठाणे शहरात टेंभी नाक्यावरील मानाची दहीहंडी सोबतच नामांकित दहीहंड्यासह ठिकठिकाणी १ हजार ३५४ हंड्या बांधण्यात आल्या होत्या. शिवसेना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट आणि भाजपच्या नेत्यांच्या छबी असलेले टी शर्ट परिधान केलेले गोविंदा ठाण्यातील हंड्या फोडण्यासाठी खाजगी बसेस, ट्रक, टेम्पो, दुचाकीवरून आले होते. अनेक गोविंदा दुचाकीवरून आल्याने शहरात गोविंदांच्या दुचाकी रॅलीची अनुभूती आली. एका दुचाकीवरून तीन गोविंदा पथकांचा प्रवास सुरु होता.

**■ ठाण्यात सेलिब्रिटींची मांदियाळी** - टेंभी नाक्यावर धर्मवीर आनंद दिघे यांची मानाची दहीहंडी उभारली होती. या दहीहंडीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह साक्षात अभिनेता गोविंदा मंचावर अवतरला. गोविंदाने 'हर हर महादेव' चा जयघोष करीत गोविंदा पथकांचा उत्साह वाढवला. यावेळी अभिनेते प्रसाद ओक, सुनिल शेट्टी, जॅकी श्रॉफ आदीसह धर्मवीर चित्रपटात एकनाथ शिंदेंची भूमिका साकारणारे अभिनेते क्षितीज दातेही उपस्थित होते. ठाण्यातील आ. रवींद्र फाटक यांच्या संकल्प प्रतिष्ठान, घोडबंदर हिरानंदानी मेडोज येथील स्वामी प्रतिष्ठान, आ. प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडीत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सेलिब्रेटींची मांदियाळी पाहायला मिळाली.

**■ मुसळधार पाऊसाची हजेरी गोविंदा ओलाचिंब...महिवूला पथकाची अबळ** - ठाण्यात सकाळपासुनच पावसाचाही गोविंदा सुरू असल्याने गोविंदा पथके चिंब झाली होती. पावसामुळे पदपथावर गोविंदांच्या खाण्यापिण्याची आबाळ झाली, त्यामुळे अनेकांनी वडापाववर ताव मारला.तर, महिला गोविंदा पथकातील सदस्यांची स्वच्छतागृहा अभावी आबाळ झाल्याचे दुर्दैवी चित्र दिसुन आले. पाऊस आणि असुविधामुळे महिला पथकाची दुरावस्था झाली.

**■ टेंभीनाक्यावर अवतरला अभिनेता गोविंदा** - ठाण्यात मंगळवारी टेंभी नाक्यावर धर्मवीर आनंद दिघे यांची मानाची दहीहंडी उभारली होती. या दहीहंडीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह साक्षात अभिनेता गोविंदा मंचावर अवतरला. गोविंदाने 'हर हर महादेव' चा जयघोष करीत गोविंदा पथकांचा उत्साह वाढवला. यावेळी अभिनेते प्रसाद ओक, सुनिल शेट्टी, जॅकी श्रॉफ आदीसह धर्मवीर चित्रपटात एकनाथ शिंदेंची भूमिका साकारणारे अभिनेते क्षितीज दातेही उपस्थित होते.

**■ जखमी गोविंदाची संख्या वाढण्याची शक्यता ? दोन अल्पवयीन मुलांचा समावेश** - ठाण्यात लाखोंच्या बक्षिसांची मांदियाळी असल्याने मोठ्या प्रमाणात गोविंदा पथके, महिला गोविंदा पथके यांची भरमार होती. मंगळवारी संध्याकाळ पर्यंत कळव्याच्या छत्रपातीं शिवाजी रुग्णालयात दाखल केलेल्या गोविंदामध्ये अल्पवयीन गोविंदा कार्तिक माने(१३), प्रतीक ठोके(१२), श्रेयस पाटील(१८), श्रवण कांबळे(१९), अनिश चंद्रवंशी(२०) याना हातपाय याला मर लागल्याने त्यांच्यावर उपचार करून त्यांना सोडण्यात आले. तर कळव्याच्या नंदिनी अपार्टमेंट, भुसारआळी रोड, कळवा,येथे राहणाऱ्या जिग्नेश तांबले(२६) याच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर असून छ.शि.म. रुग्णालय, कळवा येथे उपचार सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दररोज वाचा ...
दै. महाराष्ट्र सम्राट

## महायुतीच विधानसभेची हंडी फोडणार- मुख्यमंत्री शिंदे

**(पान १ वरून)** कितीही रडगाणे केले, तरी सुद्धा विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. आमच्या सरकारने लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी आणि आता लाडका गोविंदा अशा योजना आणल्या. परंतु या योजनांमुळे विरोधकांच्या पोटात दुखू लागले असून यामुळे ते सातत्याने आरोप करत आहेत, त्यांच्या पाया खालची वाळू सरकली आहे. विरोधकांनी कितीही आरोप केले तरी सुद्धा विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार असल्याचा दावा त्यांनी केला.

आमचे सरकार आल्यानंतर सर्व सण, उत्सव हे निर्बंधमुक्त केले. गोविंदा आता प्रो गोविंदा केला, त्यांचा विमा काढला. प्रत्येक गोविंदाने हा खेळ खेळताना काळजी घ्यावी असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. आनंद दिघे यांनी सुरू केलेला हा सण आता महाराष्ट्र मध्ये देखील मोठ्या उत्साहात साजरा केला जात असल्याचेही ते म्हणाले.

## कोणत्याही गुन्हेगाराला सोडणार नाही-मुख्यमंत्री

**(पान १ वरून)** आम्हीही आमच्या लहानपणी या खेळात उत्साहाने सहभागी होवून दहीहंड्या फोडत असू. आता हा उत्सव सातासमुद्रापलीकडे पोहोचलाय. प्रो-कबड्डी प्रमाणे हा प्रो-गोविंदा खेळ झाला. शासनाने या खेळाला साहसी खेळ म्हणून मान्यताही दिली आहे. आमदार प्रताप सरनाईक यांनी या खेळामध्ये खूप लक्ष घालून या खेळाला लोकप्रिय बनविण्यात मोठा हातभार लावला आहे. त्यांनी या खेळाची व्यापकता वाढविली आहे. त्यातला साहसीपणा व धोका लक्षात घेऊन सर्व गोविंदांचा विमा काढण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात आली होती. शासनाने ही मागणी तात्काळ मान्य केली. सर्व गोविंदांचा विमा काढण्यात आला. ते पुढे म्हणाले, असे असले तरी हा उत्सव सुरक्षितपणे साजरा करणे, ही आपली जबाबदारी आहे. आपले कुटुंबीय आपली वाट पाहत असतात. २०११ या वर्षी नऊ थरांचा विक्रम या दहीहंडी उत्सवात झाला होता. जय जवान या मित्रमंडळाने हा विक्रम केला होता आणि याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली होती. आपल्याकडे एकापेक्षा एक मित्रमंडळे, दहीहंडी पथके आहेत, जे या खेळामधील विक्रम दरवर्षी मोडताना दिसत आहेत. परंतु ही सोपी गोष्ट नव्हे. यासाठी वर्षभर मेहनत घ्यावी लागते, कसून सराव करावा लागतो. एकाग्रपणे सांघिक भावनेने या खेळाचे प्राविण्य मिळवावे लागते. या गोविंदाची मेहनत बघून हे शासन आपल्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे राहील. जे जे शक्य आहे ते सर्व काही गोविंदांसाठी करण्यात येईल.

मुख्यमंत्र्यांनी शेवटी महिला गोविंदा पथकांचेही विशेष अभिनंदन केले.

## अडीच वर्षांपुर्वी पापाची हंडी फोडली - उपमुख्यमंत्री



ठाणे - अडीच वर्षांपुर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आम्ही पापाची हंडी फोडून राज्यात एक पुण्याची हंडी उभारली, अशी टिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी ठाण्यातील दहीहंडी उत्सवात बोलताना विरोधकांवर केली. तसेच २०२४ मधील हंडी आम्हीच फोडणार असल्याचे सांगत त्यांनी अप्रत्यक्षपणे विधानसभा निवडणुक जिंकणार असल्याचा दावा केला.

ठाणे शहरात राजकीय नेत्यांशी संबंधित मंडळांकडून दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदाही शहरात अशा दहीहंड्यांचे आयोजन करण्यात आले होते. यातील स्वामी प्रतिष्ठान, संस्कृती युवा प्रतिष्ठान, टेंभीनाका मित्र मंडळ, संकल्प प्रतिष्ठान, भाजप ठाणे शहर आणि शारदा संकल्प प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी उत्सवांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावून गोविंदांसोबत संवाद साधला. दहीहंडीतील काला हा प्रेमाचा आहे, तो सगळ्यांनी वाटून खायचा आहे. हंडी कोणही फोडली तरी कालामात्र सगळ्यांचा आहे. त्यामुळे हा काला सगळ्यांनी प्रेमाने खायचा आहे. हाच संदेश प्रभू श्रीकृष्णाने आपल्याला हंडीच्या काल्यातून दिला आहे. आपला समाज एकसंघ ठेवण्याचा हा काला आहे. समाजात प्रेम वाढले पाहिजे म्हणून हा काला आहे. आपल्या शक्ती मिळाली पाहिजे म्हणून हा काला आहे, असे फडणवीस म्हणाले.

टेंभी नाक्यावर जो जोश दिसतोय, तो शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांनी निर्माण केलेला जोश आहे. हा जोश कसा तयार झाला हे अनुभवायचे असेल तर लवकरच धर्मवीर-२ चित्रपट येतोय, असे फडणवीस म्हणाले. चांगले काम करायला लागलो की पावसाचा आर्शीवाद मिळतो, असे सांगत अडीच वर्षापुर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आम्ही पापाची हंडी फोडून महाराष्ट्रात एक पुण्याची हंडी उभारली. त्यामुळे काळजी करू नका, २०२४ मधली हंडी आम्हीच फोडणार आहोत, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

जा.क्र. १२२२/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर
२१० दुसरा माळा,
प्रशासकिय कार्यालय व शासकीय कार्यालय
बोईसर रोड, कोळगांव,
पालघर (प)- ४०१४०४
दि. २३/०८/२०२४

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, पालघर विभाग, पालघर**

**जाहीर नोटीस**
**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२- नियम ७ व ७ अ वाचावे)**

**बदल अहवाल क्रमांक : ३२५/२०२४**

ज्या अर्थी, Barve Education Society F-03 Palghar Residing at Post Bhugaon Budruk Nirmal, Tal, vasai Dist. palghar या सार्वजनिक विश्वस्त व्यवथेच्या सादरकर्ता विश्वस्त श्री. Mr Pandurang Gajanan Naik यांनी कलम-२२ यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे. व तो सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक २०.०८.२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्या अर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ३० दिवसांचे आत सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर दाखल करावी. अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती दिनांक ०७.१०.२०२४ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
आज दिनांक २३.०८.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पालघर यांच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक.
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर

जा.क्र. १२२३/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर
२१० दुसरा माळा,
प्रशासकिय कार्यालय व शासकीय कार्यालय
बोईसर रोड, कोळगांव,
पालघर (प)- ४०१४०४
दि. २३/०८/२०२४

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, पालघर विभाग, पालघर**

**जाहीर नोटीस**
**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२- नियम ७ व ७ अ वाचावे)**

**बदल अहवाल क्रमांक : २९२/२०२४**

ज्या अर्थी, Barve Education Society F-03 Palghar Residing at Post Bhugaon Budruk Nirmal, Tal, vasai Dist. palghar या सार्वजनिक विश्वस्त व्यवथेच्या सादरकर्ता विश्वस्त श्री. Mr Pandurang Gajanan Naik यांनी कलम-२२ यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे. व तो सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक २०.०८.२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्या अर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ३० दिवसांचे आत सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर दाखल करावी. अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती दिनांक ०७.१०.२०२४ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
आज दिनांक २३.०८.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पालघर यांच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक.
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर

**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सूचना क्र. नमुंमपा/श.अ./ 95 /2024-25**

**कामाचे नाव:- नेरुळ से- 16 व 18 येथील रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.**

**अंदाजपत्रकीय रक्कम (रु.).:- 1,10,81,600/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणकप्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक- 28/08/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**( शिरीष गं. आरदवाड )**
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/274/2024

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

घनकचरा व्यवस्थापन विभाग
अल्प मुदतीची निविदा सूचना

श्री.गणेश विसर्जना दिवशी निर्माल्य जमा करण्यासाठी अतिरिक्त डंपर्स व मनुष्यबळ गणेशोत्सवाच्या काळात श्री गणेश मुर्ती स्विकृती केंद्रावर मुर्ती स्विकारणे, निर्माल्य उचलणे व फिरते श्री. विसर्जन सेवेसाठी तसेच नवरात्री विजयादशमीच्या भाडेतत्वावर उपलब्ध करून घेणेकामी अल्प मुदतीची निविदा मागविण्यात येत आहे. सदरच्या कामाचे निविदा प्रपत्र www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.२८/८/२०२४ ते दि. ०३/०९/२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. पर्यंत उपलब्ध असून प्राप्त निविदा दि. ०४/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. किंवा निविदा उघडण्याची पुर्व सूचना देऊन निविदाकार अथवा त्यांच्या प्रतिनिधींसमोर उघडण्यात येतील. प्राप्त झालेली कोणतीही निविदा पुर्णत: अथवा अशंता: स्विकारणे अथवा नाकारण्याचे हक्क ठाणे महानगरपालिकेकडे राहतील.

ठामपा/पिआरओ/घ.क.व्य/३७३/२०२४-२५ सही/-
दि:२६.०८.२०२४ उपआयुक्त
Pls visit our official web-site घनकचरा व्यवस्थापन विभाग
www.thanecity.gov.in ठाणे महानगरपालिका,ठाणे

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**विद्युत विभाग**

निविदा सूचना क्रमांकः- ठा.म.पा./विद्युत/नि.सू./२१/२०२४-२५

ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा कोपरी प्रभाग समिती अंतर्गत नौपाडा परिसरातील इमारतीतील ए.सी. व वॉटर कुलरची वार्षिक निगा, देखभाल व दुरुस्ती करणे, ठामपाच्या मुख्य प्रशासकीय भवनाच्या इमारती मधील तीन उद्वाहनांची वार्षिक निगा , देखभाल व दुरुस्ती करणे अशा एकूण दोन कामांकरिता निविदा ई टेंडरिंग पध्दतीने दि.२८/०८/२०२४ ते दि. ०४/०९/२०२४ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. निविदा ई टेंडरिंग पध्दतीने https://mahatenders.gov.in वर दि.०४/०९/२०२४ पर्यंत दुपारी ३.०० या वेळेत स्विकारण्यात येतील व दि. ०४/०९/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता उघडण्यात येईल.

ठामपा/पिआरओ/विद्युत-मु/३७०/२०२४-२५ सही/-
दि:२६.०८.२०२४ उपनगर अभियंता (विद्युत)
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार – २ नायब सुभेदार –
■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:– (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: १०००/– मागासवर्गीय: ९००/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिंटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)




पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/ OBC/EWS: 500/- SC/ST/ ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर
■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिंटेंडंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स–रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/– SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/–
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

## भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा
■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: दिल्ली
■ Fee: General/OBC: ४००/– SC/ST/PWD/ExSM²: २००/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

## केंद्रीय लोकसेवा आयोग

■ पदाचे नाव :
१ डेप्युटी सुपरिटेंडिंग आर्कियोलॉजिस्ट ६७
२ केबिन सेफ्टी इंस्पेक्टर १५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) पदव्युत्तर पदवी (Archaeology/Indian History/–nthropology) (ii) PG डिप्लोमा/ एडवांस डिप्लोमा (Archaeology) किंवा ०३ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) केबिन क्रू म्हणून दहा वर्षांचा अनुभव आणि सध्या केबिन क्रू म्हणून कार्यरत.
■ वयाची अट: ०५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० वर्षांपर्यंत
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: २५/– SC/ST/PH/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM²)
■ अधिकृत वेबसाईट https://upsc.gov.in/

## उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/– SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

### महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी

# भारतीय संघाची घोषणा!

नवी दिल्ली : बीसीसीआयने मंगळवारी महिला टी–२० विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा केली. हरमनप्रीत कौरकडे संघाची कमान सोपवण्यात आली आहे. स्मृती मंधानाला उपकर्णधारपद देण्यात आले आहे. ३ ऑक्टोबरपासून विश्वचषकाला सुरुवात होत आहे. अंतिम सामना २० ऑक्टोबर रोजी होणार आहे. भारतीय संघाचा पहिला सामना ४ ऑक्टोबरला न्यूझीलंडशी होणार आहे.

बीसीसीआयनेच्या महिला निवड समितीने एकूण २० खेळाडूंची निवड केली आहे. त्यापैकी १५ खेळाडू मुख्य संघाचा भाग आहेत आणि ५ खेळाडू राखीव म्हणून निवडले गेले आहेत. तीन खेळाडू संघासोबत प्रवास करू शकतात, तर दोन खेळाडू स्टँड बाय मोडवर असतील. कोणत्याही खेळाडूला दुखापत झाल्यास त्या खेळाडूला यूएईलाही पाठवले जाऊ शकते.

यास्तिका, श्रेयंका जखमी

सध्या संघाचे दोन खेळाडू जखमी झाले आहेत. त्यापैकी एक यष्टीरक्षक यास्तिका भाटिया आणि दुसरी गोलंदाज श्रेयंका पाटील आहे. जर त्या तंदुरुस्त नसतील तर राखीव खेळाडूंमधून कोणतेही दोन खेळाडू अंतिम पंधरामध्ये निवडले जाऊ शकतात. मात्र, सध्यातरी या दोन्ही खेळाडूंना ३ ऑक्टोबरपासून होणाऱ्या महिला टी–२० विश्वचषक स्पर्धेसाठी अंतिम १५ मध्ये ठेवण्यात आले आहे, तर उमा छेत्री (यष्टीरक्षक), तनुजा कंवर आणि सायमा ठाकोर यांना ट्रॅव्हलिंग रिझर्व्ह म्हणून ठेवण्यात आले आहे. त्याचवेळी, निवडकर्त्यांनी राघवी बिश्त आणि प्रिया मिश्रा यांना नॉन ट्रॅव्हलिंग रिझर्व्हमध्ये ठेवले आहे.

**६ ऑक्टोबरला भारत–पाक सामना**

आयसीसीने सोमवारी आगामी महिला टी–२० विश्वचषकाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले. स्पर्धेसाठी १० संघांची दोन गटांत विभागणी करण्यात आली आहे. भारत, न्यूझीलंड, पाकिस्तान, श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया यांचा अ गटात समावेश आहे. तर ब गटात दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, वेस्ट इंडिज, बांगलादेश आणि स्कॉटलंड हे संघ आहेत. प्रत्येक संघ चार गट सामने खेळेल. भारतीय महिला संघ ६ ऑक्टोबरला कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी भिडणार आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. २० ऑक्टोबर रोजी दुबईत अंतिम सामना रंगणार आहे.

**भारताचा संघ :** हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, रिचा घोष (विकेटकीपर), यास्तिका भाटिया (विकेटकीपर), पूजा वस्त्राकर, अरुंधती रेड्डी, रेणुका सिंह ठाकूर, दयालन हेमलता, आशा शोभना, राधा यादव, श्रेयंका पाटील, सजना सजीवन.

**ट्रॅव्हलिंग रिझर्व्ह खेळाडू :** उमा छेत्री (विकेटकीपर), तनुजा कंवर, सायमा ठाकोर.

**नॉन ट्रॅव्हलिंग रिझर्व्ह खेळाडू :** राघवी बिस्त, प्रिया मिश्रा.





# कंगना यांना धमकी! "Emergency रिलीज केल्यास तुमचा शिरच्छेद करु'

अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना रणौत यांची प्रमुख भूमिका असलेला 'इमर्जन्सी' (Emergency) चित्रपट पुढील महिन्यात ६ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात कंगना यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी कंगना यांना शीख उग्रवादी गटांकडून जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. 'इमर्जन्सी' चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर रिलीज झाल्यानंतर कंगना यांना धमक्या आल्या आहेत. कंगना ह्या हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील भाजपच्या खासदार आहे.

दरम्यान, कंगना यांनी या प्रकरणी पोलिसांची मदत मागितली आहे. सोशल मीडियावरील एका व्हिडिओमध्ये, विकी थॉमस सिंग हा एक ख्रिश्चन बनलेला निहंग शीख आहे; ज्याने माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येचा एक गूढ उल्लेख केला आहे.

### 'इंदिरा गांधी यांचे काय झाले होते?'

जर चित्रपटात त्याला (मारला गेलेला खलिस्तानी दहशतवादी जर्नेलसिंग भिंद्रनवाले) दहशतवादी म्हणून दाखवला असेल, तर तुम्ही ज्या व्यक्तीचा चित्रपट करत आहात; त्या व्यक्तीचे (इंदिरा गांधी) काय झाले होते? सतवंत सिंग आणि बेअंत सिंग कोण होते? आम्ही आमचे मस्तक संतजींना अर्पण करू, आणि जे डोके देऊ शकतात ते शिरच्छेदही करु शकतात, असे त्या व्यक्तीने व्हिडिओमध्ये म्हटले आहे. सतवंत सिंग आणि बेअंत सिंग हे इंदिरा गांधींचे दोन अंगरक्षक होते. ज्यांनी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांची हत्या केली होती.

### कंगना यांनी मागितली पोलिसांची मदत

मायक्रो–ब्लॉगिंग साइट द वर हा व्हिडिओ शेअर करत कंगना रणौत यांनी पोलिसांची मदत मागितली आहे. कृपया याकडे लक्ष द्यावे, असे त्यांनी पुढे पोस्टमध्ये लिहिले आहे. हे ट्विट त्यांनी महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश आणि पंजाब पोलिसांना टॅग केले आहे.

### Emergency चित्रपटावर बंदीची मागणी

अनेक शीख संघटनांनी ६ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणाऱ्या एशीसशपलू चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. या चित्रपटात शीख समुदायाला चुकीच्या पद्धतीने दर्शवण्यात आले असल्याचा त्यांचा दावा आहे. शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीने म्हटले आहे की, भिंद्रनवाले याला समुदायाचा शहीद म्हणून घोषित केले असून संपूर्ण शीख समुदायाची फुटीरतावादी म्हणून प्रतिमा निर्माण करणे चुकीचे आहे.

# दह्यात मीठ टाकावे की साखर? तुमच्यासाठी काय चांगले आहे आणि का?

दही हा आपल्या रोजच्या आहारातील एक मुख्य पदार्थ आहे. दही त्याच्या प्रो–बायोटिक गुणधर्मांसाठी ओळखले जाते. जेवणाची चव वाढविण्यासाठी अनेकदा दही वापरले जाते. काही लोकांना साखर किंवा मीठ टाकून नुसते दही खायला आवडते. पण, दह्यात मीठ टाकावे की साखर, असा प्रश्न अनेक आरोग्यप्रेमींना पडतो. दोन्हीपैकी आपल्या आरोग्यासाठी कोणती गोष्ट चांगली आहे, असा वाद अनेकदा होतो. याबाबत तज्ज्ञांचे मत काय आहे ते जाणून घेऊ.

दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सल्लागार, आहारतज्ज्ञ व प्रमाणित मधुमेह शिक्षक यांच्या कनिक्का मल्होत्रा यांनी सांगितले, साखर असलेल्या दह्याचे सेवन केल्यास त्यातील साखरेमुळे अधिक कॅलरीज मिळतात. मध्यम प्रमाणात मीठ टाकून दह्याचे सेवन केल्यास कॅलरीचा प्रभाव नगण्य असतो.

मिठाच्या तुलनेत साखर कार्बोहायड्रेटचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढवते; पण त्यामध्ये काहीही पोषक घटक नसतात. मीठ असलेले दही शरीरातील सोडियमचे प्रमाण वाढवते, जे इलेक्ट्रोलाइट समतोल राखण्यासाठी महत्त्वाचे आहे; परंतु त्याचे सेवन करताना संयम आवश्यक आहे. विशेषत: उच्च रक्तदाब असलेल्यांनी काळजी घ्यावी.

मीठ आणि साखर हे दोन्ही पर्याय दह्यातील प्रथिने, कॅल्शियम आणिआतड्यातील चांगले जीवाणू (प्रो–बायोटिक्स) यांसारखे मूळ पोषक घटक टिकवून ठेवतात. पण, ज्यांना मधुमेह किंवा वजनावर नियंत्रण ठेवायचे हे त्यांनी मीठ टाकून दही खाणे हा एक चांगला पर्याय आहे. दह्यामध्ये मीठ किंवा साखर मिसळल्याने पचन आणि आतड्यांच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो?

मल्होत्रा सांगतात, दह्यात मीठ टाकल्याने आतड्यातील जीवाणूंवर थेट परिणाम होत नाही. हे पोटातील ॲसिडचे उत्पादन वाढवू शकते, काहींमध्ये पचनास मदत करते. जर जास्त साखर टाकून दह्याचे सेवन केल्याने आतड्यातील मायक्रोबायोमचे संतुलन बिघडू शकते आणि त्यामुळे दह्यातील प्रो–बायोटिक्समुळे मिळणारे फायदे कमी होतात.

मीठ असलेले दही किंवा साखर असलेले दही नेहमी खाण्याचे संभाव्य फायदे आणि तोटे .

**मीठ असलेले दही :**

**फायदे:** इलेक्ट्रोलाइट संतुलनास समर्थन देते, तृप्तीची भावना वाढवते, प्रो–बायोटिक फायदे टिकवून ठेवते.

**तोटे :** कॅलरीचे सेवन वाढते, रक्तातील साखरेची पातळी वाढते, जास्त साखर असलेले दही खाल्ल्यास प्रो–बायोटिक्समुळे मिळणारे फायदे कमी होतात.

साखर असलेले दही:

**फायदे:** जजलद ऊर्जा निर्माण करते, गोड पदार्थ आवडणाऱ्यांसाठी चविष्ट पर्याय

**तोटे:** कॅलरीचे सेवन वाढते, रक्तातील साखरेची पातळी वाढते, जास्त साखर असेलेल दही खाल्यास प्रोबायोटिक्समुळे मिळणारे फायदे कमी होतात.

मल्होत्रा यांच्या मते, काही विशिष्ट सांस्कृतिक आणि पाकविषयक संदर्भांनुसार मीठ किंवा साखर टाकलेले दही तयार करण्याची वेगवेगळी पद्धत आहे.

**मीठ असलेले दही :** जगभरातील चवदार पदार्थांमध्ये सामान्यतः रायता (भारत), डिप्स (भूमध्य), सॅलड सजावटीसाठी दही असलेले मीठ वापरतात, जे या पदार्थाची चव वाढवते.

**साखर असलेले दही :** दक्षिण आशियामध्ये लोकप्रिय लस्सी, फळे व मध या नाश्त्यामध्ये साखर असलेले दही वापरतात.

# अखेर दिव्याच्या सरकत्या जिनाखालील कंटेनर हटवला

ठाणे : दिवा पूर्व येथे दिवा स्टेशनच्या बाजूला रेल्वे फाटकाजवळ असलेल्या सरकत्या जिनाखालील एका ठेकेदाराने कंटेनर ठेवले असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली होती. शिवसेनेचे दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांनी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन दिले. पालिका प्रशासनाने तत्काळ कंटेनर हटवून रस्ता मोकळा केला आहे.

दिव्यातील साबे गावात जाणाऱ्या रस्त्याच्या मार्गात एका कंटेनरने नागरिकांची वाट अडवली होती. त्यामुळे गावात जाणाऱ्या वर्दळीच्या रस्त्याला अडथळा झाला होता. या ठिकाणी एफओबी बनवणाऱ्या ठेकेदाराने विनाकारण कंटेनर ठेवले असल्याचे लक्षात येताच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने कंटेनर हटविण्याची मागणी केली. त्यानंतर प्रशासनाने तातडीने दिव्यात धाव घेऊन रस्त्यात मांडलेला कंटेनर हटवला. त्यामुळे नागरिकांच्या मार्गातील अडथळा दूर झाला आहे. दिव्यात भररस्त्यावरील कंटेनर काढला असून नागरिकांचे येणे-जाणे सुकर झाले आहे.

दिवा स्टेशनच्या बाजूला रेल्वे फाटकाजवळ असलेल्या सरकत्या जिनाखालील एका ठेकेदाराने कंटेनर ठेवले असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली होती. या कंटेनरमुळे सावे गावात जाणाऱ्या नागरिकांना मनस्ताप झाला होता. ऐन वर्दळीच्या ठिकाणी असेलल्या कंटेनरने रस्त्याला अडथळा ठरत होता.





### शिवसेनेच्या पाठपुराव्याला यश

याप्रकरणी नागरिकांनी धाव घेऊन स्थानिक शिवसेना पदाधिकाऱ्यांकडे कंटेनर हटवण्याची मागणी केली. शिवसेनेचे दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांनी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन दिले. पालिका प्रशासनाने तत्काळ कंटेनर हटवून रस्ता मोकळा केला आहे. दरम्यान, दिव्यातील नागरिकांनी शिवसेनेचे आभार मानले.

दिवा स्टेशन पूर्व रेल्वे फाटक येथील सरकत्या जिन्याखाली गेल्या कित्येक दिवसांपासून एक कंटेनरमध्ये बेकायदा कार्यालय उभारण्यात आले होते. याची अधिक माहिती घेतली असता एका ठेकेदाराने रस्ता अडवून कंटेनर ठेवले असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, वर्दळीच्या रस्त्याला अडथळा करून मुजोर ठेकेदाराने रस्ता अडवला होता. त्यामुळे रेल्वे प्रशासन आणि पालिकेला निवेदन दिल्यानंतर वाहनांचा अडथळा दूर झाला.

**–सचिन पाटील** (शिवसेना दिवा शहरप्रमुख)

संदीप नाईक प्रतिष्ठानच्या सौजन्याने शुक्रवारी बेलापूर येथे महारोजगार मेळाव्याचे आयोजन

# ५० पेक्षा अधिक कंपन्यांचा सहभाग

**5000 पेक्षा अधिक रोजगारांच्या संधी**

नवी मुंबई : बेरोजगार युवक, युवतींना त्यांच्या स्वप्नातील रोजगार प्राप्त करून देणारा विनामूल्य महारोजगार मेळावा संदीप नाईक प्रतिष्ठानच्या सौजन्याने शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९ वाजता वारकरी भवन, वायएमसीए मार्ग, सेक्टर ४ सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे. या महारोजगार मेळाव्यामध्ये विविध क्षेत्रातील ५० कंपन्या सहभागी होणार असून त्यामधून पाच हजारांपेक्षा अधिक रोजगार आणि स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. आतापर्यंत नऊ यशस्वी महारोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले असून यंदाचा हा दहावा महारोजगार मेळावा आहे.

या महारोजगार मेळाव्यामध्ये नवी मुंबई आणि मुंबईमधील बँकिंग, बॅक ऑफिस, बीपीओ, विमानतळ, माझगाव डॉक, पेशंट केअर, आयटी, आयटीआय, फॅसिलिटी मॅनेजमेंट, फिनान्स, इन्शुरन्स, सिक्युरिटी, उत्पादन, ट्युटोरियल्स, इंजिनिअरिंग, फूड, रिटेल, कम्प्युटर हार्डवेअर ऍन्ड नेटवर्कींग, हॉस्पिटल्स, सेल्स ऍन्ड मार्केटींग, हॉटेल इंडस्ट्री इत्यादी क्षेत्रातील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. अनेक शासकीय महामंडळ सहभागी होणार आहेत. माजी सैनिक आणि निवृत्त पोलिसांसाठी रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत तर कॉलेज विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी इंटर्नशिपच्या संधी आहेत. पीवल फ्री ट्रेनिंग बद्दल विशेष माहिती देण्यात येणार आहे. रोजगार, उद्योजकता विकास आणि स्वयंरोजगाराच्या संधीची माहिती आणि या संधी प्राप्त करण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन पार पडणार आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या तसेच महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. यशस्वी मुलाखतीसाठी उमेदवारांना तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन लाभणार आहे. करियर विषयक मार्गदर्शन केले जाणार आहे. मेळाव्यात ज्यांना नोकर्या मिळणार आहेत त्यांना मान्यवरांच्या हस्ते तात्काळ नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. या विनामूल्य महारोजगार मेळाव्याचा लाभ तरुण आणि तरुणींनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी केले आहे. महा रोजगार मेळाव्यामध्ये नाव नोंदणीसाठी किंवा याविषयी अधिक माहितीसाठी ०२२-४५११८४९९/८८५०५८८०६९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

# नवी मुंबईत आता पर्यटन विकास आराखडा

नवी मुंबई : सिडकोच्या जुन्या इमारतींच्या जागी नव्याने उभे राहाणारे पुनर्विकास प्रकल्प आणि नव्या विकास आराखड्यामुळे शहरातील बहुसंख्य उपनगरांचा चेहरामोहरा बदलण्याची चिन्हे दिसत असतानाच नवी मुंबई महापालिकेने शहराचा पर्यटन विकास आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

शहरातील प्रत्येक उपनगरात असलेली उद्याने, धारण तलाव, फ्लेमिंगो तसेच दुर्मिळ पक्ष्यांचा असलेला अधिवास, पारसिक डोंगरांच्या रांगा या सगळ्याचा अभ्यास करून पर्यटनासाठी नव्याने विकास संकल्पना आखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा सर्वकक्ष अभ्यास तसेच अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पालिकेने नुकताच शहराचा अंतिम विकास आराखडा जाहीर केला. शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या पाणथळीच्या जागा तसेच काही हरित पट्ट्यातील मोठ्या जमिनी निवासी संकुलांसाठी खुल्या करण्याचा निर्णय या विकास आराखड्यात घेण्यात आल्याने पर्यावरण प्रेमी नाराज आहेत. शहरातील मोक्याचे भूखंड निवासी तसेच वाणिज्य वापरासाठी खुले करण्यात आल्याच्या तक्रारीही पुढे येऊ लागल्या आहेत. विशेष म्हणजे पाम बिच मार्गावर पाणथळीच्या जागा निवासी संकुलांसाठी खुल्या केल्या जात असल्याने फ्लेमिंगो तसेच दुर्मिळ पक्ष्यांचा अधिवास धोक्यात असल्याच्या तक्रारी आहेत.

# ४७ शाळा सीसीटीव्हीविना

### सखी सावित्री तसेच विशाखा समितीबाबतही शाळांचे दुर्लक्ष

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेच्या सर्व ५७ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असली तरी पालिकेनेच माहिती घेतल्यानुसार शहरातील ४३० शाळांपैकी ३८३ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असल्याची लिंकद्वारे माहिती दिली आहे. तर काही शाळांनी अद्याप लिंकद्वारे माहिती दिलेली नाही. मुलामुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप व समतामूलक वातावरण निर्मितीसाठी २०२२ साली सखी सावित्री समिती स्थापन करण्याचे निर्देश शासनाने दिले असले तरी शहरातील किती पालिका व खासगी शाळांमध्ये ही

पालिकेच्या शाळांमध्ये शाळेत सीसीटीव्ही यंत्रणा असूनही एका पालिकेच्या शाळेत भेट दिल्यानंतर शाळेत सीसीटीव्ही यंत्रणेबाबत अध्यापकांना विचारले असता शाळेत सीटीटीव्ही बंद असल्याचे सांगितले. त्यामुळे शाळेतील सुरक्षेबाबत सर्वांनीच सजग राहण्याची गरज आहे.
– सुधीर दाणी,
सजग नागरिक मंच

विद्यार्थी सुरक्षेबाबत सीसीटीव्ही यंत्रणा व विशाखा समिती व सखी सावित्री समितीची माहिती मागवली असून सर्व शाळांची माहिती प्राप्त केली जात असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. मुलांच्या सुरक्षेबाबत कोणताही हलगर्जीपणा तसेच निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही. शहरातील सर्व शाळांची माहिती प्राप्त करण्यात येत आहे.
अरुणा यादव, शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महापालिका

पालिकेच्या शिक्षण विभागाने सखी समिती गठीत करुन तात्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश शाळांना दिले आहेत. त्या लिंकमध्ये जवळजवळ ४७ शाळांनी सीसीटीव्ही यंत्रणबाबतची माहिती पाठवलेली नाही. पालिकेने सीसीटीव्ही यंत्रणाबाबत व विविध समित्यांबाबत शाळांकडून गुरुवारी अहवाल लिंकद्वारे मागवला असून अद्याप पूर्णत: अहवाल प्राप्त झाला नाही. नवी मुंबई महापालिका शिक्षण विभागाने शहरातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना याबाबत पत्र दिले होते तसेच तक्रारपेटी व सखी सावित्री समितीबाबत तात्काळ अहवाल देण्याचे आदेश दिले होते.

काही शाळांमधील सीसीटीव्हीबाबत माहिती प्राप्त झाली नसल्याने याबाबतही पालिकेने योग्य ती खबरदारी घेणे अपेक्षित आहे. शाळास्तरावर सखी सावित्री समिती गठन करताना त्या समितीमध्ये १० सदस्य असून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हेच या समितीचे अध्यक्ष असतात. शहरातील सखी सावित्री समितीबाबत व विशाखा समितीबाबतही शाळांची अद्यायावत माहिती मिळवून योग्य ती कार्यवाही करण्याची तयारी पालिकेने केली आहे. दरमहा सखी सावित्री समिती तसेच विशाखा समिती या समितीची बैठक आयोजित करण्याचे आवश्यक आहे. परंतु राज्य शासनस्तरावर सखी सावित्री समिती गठीत करण्याचे निर्देश दिलेले असताना किती शाळांमध्ये या समिती आहेत हा संशोधनाचा विषय असल्याचे चित्र आहे. कारण पालिकेने जमा केलेल्या माहितीत पहिल्याच दिवशी समिती गठीत केलेल्यांची संख्या कमी होती.

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने

# 'विद्यार्थी सुरक्षा व व्यवस्थापनाची भूमिका' या विषयावर कार्यशाळा

पनवेल : पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षा विषयक उपाय योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणीसाठी आयुक्तमंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार विद्यार्थी सुरक्षा व व्यवस्थापनाची भूमिका याबाबतची कार्यशाळा गुरुवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी सकाळी साडे नऊ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा होता आहे. बदलापूर येथे घडलेल्या अनुचित घटनेच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत शासन निर्णयानुसार महापालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे .या कार्यशाळेमध्ये अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, स्थानिक पोलीस प्रशासन, शाळा व्यवस्थापन प्रतिनिधी व शिक्षण विभागातील अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी पोक्सो अधिनियम व त्यामधील तरतूदी, शाळा व्यवस्थापन (संस्था, मुख्याध्यापक व व्यवस्थापन समिती) यांच्या विद्यार्थ्यांच्या संबधीच्या जबाबदाऱ्या, पोक्सो अधिनियम अंतर्गत दाखल होणारे गुन्हे व कार्यपध्दती, विद्यार्थी सुरक्षतेच्या दृष्टीने शाळा व्यवस्थापनाने करावयाच्या उपाय योजना व २१ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णय अंमलबजावणी व शाळांनी स्थापन करावयाच्या विविध समित्या यांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्वाची असल्याने या कार्यशाळेस महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी शाळांचे संस्थाचे अध्यक्ष अथवा सचिव, सर्व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सर्व खाजगी अनुदानीत, अशंत: अनुदानीत, विना अनुदानीत, स्वयं अर्थ सहाय्यित शाळांचे मुख्यध्यापक, प्राचार्य, सर्व माध्यमे, सर्व व्यवस्थापनाच्या (प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक) सर्व बोर्डाच्या शाळांनी उपस्थित राहावे अशा सूचना महापालिकेच्या शिक्षण विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# लसणाच्या दरात तेजी, घाऊक बाजारात प्रतिकिलो ४०० रुपयांवर

नवी मुंबई : मागील दोन वर्षांपासून लसणाची लागवड कमी आहे त्याचबरोबर उत्पादनही कमी आहे. त्यामुळे बाजारात कमी आवक होत आहे, परिणामी आवक कमी असल्याने दर गगनाला भिडले आहेत. घाऊक बाजारात प्रतिकिलो १५०-३०० रुपयांवर असलेले लसूण आता २००-४०० रुपयांवर पोहोचले आहेत.महाराष्ट्रातील गावरान तसेच परराज्यातील लसणाच्या लागवडीत गेल्या काही वर्षांपासून घट होत आहे. तसेच मागील वर्षीही लसणाच्या दराने उच्चांक गाठला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी मागील वर्षीचा नवीन लसूण विक्रीसाठी बाहेर काढला होता. त्यामुळे यंदा लसणाची साठवणूक केलेली नाही. त्यामुळे यंदा साठवणुकीचा लसूण कमी आहे. आजमितीला राज्यातील सर्वच बाजार आवारात परराज्यातील आवक घटली आहे. वाशीतील एपीएमसी बाजारात मागील काही दिवसांपासून ९ ते १२ गाड्या आवक होत असून सोमवारी १५ गाड्या मिळून एकूण ३९१७ गोण्या लसूण आवक झाली. त्यामुळे मागणीच्या तुलनेत आवक कमी होत असल्याने दरात वाढ होत आहे. सध्या मध्यप्रदेशमधील लासणाची आवक होत असून पुढील कालावधीत लसूण आणखी महाग होईल अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.

लसणाचे उत्पादन मागील काही वर्षांपासून कमी आहे. लागवड कमी असल्याने उत्पादन कमी आहे. मागील वर्षी दराने उच्चांक गाठला होता त्यामुळे बहुतांश लसूण तेव्हा विक्रीसाठी बाहेर काढला होता त्यामुळे यंदा साठवणूक कमी आहे. त्यामुळे आवक कमी झाल्याने दरात तेजी आहे. .
**–महेश राऊत,** घाऊक व्यापारी, कांदा बटाटा बाजार एपीएमसी

# साकीनाका येथे सुरक्षेचे निकष न वापरता सुरू असलेले बांधकाम, कामगारांचा जीव धोक्यात

### महाराष्ट्र बांधकाम व इतर कामगार मंडळाचे नियम मोडणे

मुंबई : बांधकाम साइटवर काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षेसाठी, महाराष्ट्र सरकारने अलीकडेच महाराष्ट्र बांधकाम आणि इतर कामगार मंडळ २०२४ ची स्थापना केली आहे. याअंतर्गत महाराष्ट्र शासनामार्फत कामगारांना विविध योजनांचा आर्थिक लाभ दिला जाणार आहे. कामाच्या दरम्यान अपघातात मृत्यू झाल्यास कामगारांना ५००,००० ची भरपाई देण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र सरकारने मजुरांना कामावर ठेवणाऱ्या कंत्राटदारांना सुरक्षा नियमांचे पालन करण्याच्या सक्त सूचनाही दिल्या असून, सुरक्षा मानकांचे पालन न करणाऱ्या कंत्राटदारांना तुरुंगात पाठवण्याची तरतूदही या मंडळाकडून करण्यात आली आहे. बोर्डाच्या नियमांचे उल्लंघन कुर्ल्यातील एल वॉर्ड अंतर्गत प्रभाग क्रमांक १५६ मधील साकीबिहार रोडवर असलेल्या शाह इंडस्ट्रियल इस्टेटमधील इमारतीत १०० खोल्यांच्या लॉजचे बांधकाम कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता सुरू आहे. कारण ठेकेदाराला काम लवकर पूर्ण करायचे असते, त्यामुळे या बांधकामात कंत्राटदाराकडून कामगारांना सुरक्षा साधने न देता कामे करून घेतली जात आहेत. एवढेच नव्हे तर रात्रंदिवस चोवीस तास काम सुरू आहे. कृपया लक्षात घ्या की बांधकाम कामासाठी, कामगारांना टोप्या, शूज आणि इतर सुरक्षा उपकरणे घालणे अनिवार्य आहे. जेणेकरून कोणतीही दुर्घटना घडल्यास कामगाराचे मोठे नुकसान होणार नाही. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते रूपेश रवी ढोणे यांनी महापालिका प्रशासन, अग्निशमन दल आणि पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून देऊन या बांधकामाच्या ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी केली. महापालिका, अग्निशमन दल आणि पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी रुपेश रवी ढोणे यांनी संबंधित विभागांना सुरक्षा उपायांचे पालन करण्याच्या सूचना दिल्याची माहिती दिली आहे. मात्र अद्यापही कामगारांना सेफ्टी किट देण्यात आले नसल्याचा आरोप रुपेश रवी ढोणे यांनी केला आहे. अशा परिस्थितीत सर्व कामगारांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित विभागाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे.




# २८ ऑगस्ट रोजी मलेरिया, डेंग्यूसह जलजन्य, किटकजन्य व साथरोग आजारांबाबत २४ ठिकाणी विशेष शिबीर

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप, डेंग्यू तसेच जलजन्य व साथरोग आजारांबाबत जनजागृती व्हावी आणि या माध्यमातून हे आजार होण्यासाठी खबरदारी घेत प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जाव्यात यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत एकाच वेळी २४ विविध ठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

यापूर्वी ४ वेळा आयोजित केलेल्या अशा शिबिरांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला असून आत्तापर्यंत ४ दिवशी, प्रत्येक दिवशी २४ ठिकाणी झालेल्या शिबिरांना २७२९९ नागरिकांनी भेट दिलेली आहे. या शिबिरांमध्ये नागरिकांचे रक्त नमुने तपासणीची सुविधाही उपलब्ध ठेवण्यात आली असून १०५७ नागरिकांची रक्ततपासणी करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांनी दिलेली आहे.

अशाच प्रकारचे विशेष शिबीर दि. २८ ऑगस्ट २०२४ रोजी २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत आयोजित करण्यात आलेले आहे. या शिबिरांची आरोग्य केंद्रनिहाय स्थळे -

(१) सीबीडी प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात शहाबाजगाव, गावदेवी मंदिरासमोर.
(२) करावे प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात गावदेवी मंदिर, करावेगाव.
(३) से-४८ प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात नवीन सेक्टर ५०, ब्रीजखाली.
(४) नेरुळ १ प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात एच.पी.कॉरी (झोपडपट्टी परिसर)
(५) नेरूळ २ प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात प्लॉट ए- ७२, व्दारका - बी बिल्डिंग, सेक्टर २०, नेरूळ.
(६) कुकशेत प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात सारसोळेगाव, से.६ कमानीजवळ, ओमसाई मेडिकल, एसबीआय बँकेसमोर.
(७) शिरवणे प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात दत्तमंदिर शिरवणेगाव.
(८) सानपाडा प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात ज्येष्ठ नागरिक संघ, सेक्टर ८, सानपाडा.
(९) तुर्भे प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात तुर्भे बीट चौकी जवळील मैदान.
(१०) पावणे प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात उत्तम ठाकूर कार्यालय, कोपरीगांव.
(११) इंदिरानगर प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात तुर्भे एमआयडीसी, सी -६३, नरसी असोशिएट्स.
(१२) जुहुगाव प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात हनुमान मंदिर जवळ, से.१६, वाशी.
(१३) वाशीगाव प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात अग्निशमन केंद्र, से. १६ ए, वाशी.
(१४) खैरणे प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात गणपती मंडप, साईबाबा मंदिरासमोर, सेक्टर-१७, कोपरखैरणे.
(१५) महापे प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात सेक्टर २, कोपरखैरणे, हनुमान मंदिर.
(१६) घणसोली प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात घणसोली गाव, बिकानेर शॉपच्या बाजूला.
(१७) राबाडा प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात अंगणवाडी क्र. ७७, दिवागाव, विठ्ठल मंदिराजवळ.
(१८) कातकरीपाडा प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात ए.के. पाडा, गणेशोत्सव मंडळाचा मंडप, कातकरीपाडा.
(१९) ऐरोली प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात ई टाईप, संजय गांधी उद्यानासमोर, सेक्टर ३, ऐरोली.
(२०) चिंचपाडा प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात समाजमंदिर, अंगणवाडी, जुना चिंचपाडा.
(२१) दिघा प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात दुर्गानगर, दुर्गामाता मंदिराजवळ, शेड कामगार नाका, दिघा.
(२२) इलठणपाडा प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात हनुमान मंदिर, सुभाषनगर.
(२३) नोसीलनाका प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात रेल्वे लाईन झोपडपट्टी, मच्छी मार्केट .
(२४) घणसोली से-४ प्रा.ना.आ.केंद्र क्षेत्रात मुकाम्बिका मंदीराजवळ, से २ घणसोली.




- याप्रमाणे विविध २४ ठिकाणी २८ ऑगस्ट रोजी सकाळी ४० ते दुपारी २ या वेळेत सर्व तापाच्या रुग्णांचे रक्तनमुने घेण्यात येणार आहेत तसेच हिवताप, डेंग्यू आणि जलजन्य व साथरोग आजारांबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात येणार आहे.

नमुंमपा क्षेत्रातील हिवताप, डेंग्यू आणि जलजन्य व साथरोग आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागाची आवश्यकता असून नमुंमपा कार्यक्षेत्रातील नागरिकांनी आपपापल्या भागात आयोजित शिबिरांचा लाभ घेऊन माहिती करून घ्यावी तसेच ताप असल्यास रक्ताची तपासणी करुन घ्यावी असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१